# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जळगाव दि.२८ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्यावतीने ३० डिसेंबर रोजी होणाऱ्या जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करण्यासाठी १४ डिसेंबर ही अंतीम मुदत देण्यात आली आहे.

३० डिसेंबर रोजी चार ठिकाणी अविष्कार संशोधन स्पर्धा होणार आहे. जळगाव जिल्ह्याची स्पर्धा नुतन महाविद्यालय,जळगाव. धुळे जिल्ह्याची स्पर्धा विद्या विकास मंडळाचे सी.गो.पाटील महाविद्यालय, साक्री येथे, नंदुरबार जिल्ह्याची स्पर्धा तळोदा येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथे होणार आहे. तर विद्यापीठ प्रशाळांमधील विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा विद्यापीठात होईल.

गुरुवार, दि.२८ नोव्हेंबर रोजी या स्पर्धेचा आढावा घेण्यासाठी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत स्पर्धेची गुणवत्ता अधिक वाढविण्यासाठी सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना संशोधनाबाबत अधिक माहिती करुन दिली जावी. अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या स्पर्धेत विषय निहाय सहा गट करण्यात आले आहेत. त्यामध्ये पहिल्या गटात सामाजिकशास्त्र, शिक्षण, भाषा, मानव्यविद्या, ललित कला, दुसऱ्या गटात वाणिज्य, व्यवस्थापन आणि विधी, तिसऱ्या गटात विज्ञान ज्यामध्ये भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जैवशास्त्र, गणित, पर्यावरणशास्त्र, गृह आणि संगणशास्त्र, चौथ्या गटात कृषि आणि पशुसंवर्धन, पाचव्या गटात. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, व सहाव्या गटात औषधिनिर्माणशास्त्र यांचा समोवश आहे. ही स्पर्धा पदवी, पदव्युत्तर, पदव्युत्तरपदवी आणि शिक्षक या चार संवर्गात होणार आहे. पोस्टर, मोड्युलद्वारे विद्यार्थ्यांना आपला संशोधनाचा अविष्कार मराठी, हिंदी अथवा इंग्रजी या भाषेत सादर करता येईल. प्रवेशीका शुल्क २०० रूपये ठेवण्यात आले आहे.

जिल्हास्तरावर विजेत्या झालेल्या स्पर्धकांना विद्यापीठस्तरावर दि. ७ व ८ जानेवारी, २०२० रोजी होणाऱ्या स्पर्धेत सहभागी होता येईल. आजच्या या आढावा बैठकीत स्पर्धेचे समन्वयक प्रा.एस.आर.चौधरी, उपसमन्वयक प्रा.ए.जी.इंगळे, सल्लागार समितीचे प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्रा.एस.टी.इंगळे, डॉ.विवेक काटदरे, प्रा.डी.एस.पाटील यांच्यासह आयोजक महाविद्यालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी या स्पर्धेबाबत विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर संपर्कसाधावा असे आवाहन करण्यात आले.

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**बातमी:-१**

जळगाव दि.२८ (    ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील रसायनशास्त्र प्रशाळेत एम.एस्सी. □डस्ट्रीयल केमिस्ट्री या विषयात मध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनींस "कै. पांडुरंग विठ्ठल कुंभार गुरुजी सुर्वण पदक" प्रदान करण्यासाठी प्र.कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर व त्यांच्या संशोधक विद्यार्थ्यांनी दोन लाख रुपयांचा धनादेश कुलगुरू प्रा.पी.पी.पा□ील यांच्याकडे सुपूर्द केला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्र.कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर हे १९९४ मध्ये केमिकल सायन्सेस प्रशाळेत रुजू झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १९९५ मध्ये □डस्ट्रीयल केमिस्ट्री हा विषय सुरु करण्यात आला आहे. या विषयाला प्रोत्साहन मिळावे यासाठी प्रा.माहुलीकर यांनी त्यांच्याकडे संशोधन केलेल्या विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने प्रा.माहुलीकर यांचे वडील कै. पांडुरंग विठ्ठल कुंभार गुरुजी, मु.पो.माहुली, ता.खानापूर, जि.सांगली यांच्या स्मरणार्थ सुवर्ण पदक जाहीर केले आहे. त्यासाठी कुलगुरु प्रा.पी.पी.पा□ील यांच्याकडे प्रा.माहुलीकर यांनी दोन लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी प्रभारी वित्त व लेखा अधिकारी डॉ.विवेक का□दरे, प्रभारी कुलसचिव, प्रा.बी.व्ही. पवार, प्रशाळेचे संचालक प्रा.डी.एच.मोरे, प्रा.दिपक दलाल, हेमंत नारखेडे, प्रा.निलेश पवार उपस्थित होते.

प्रा.माहुलीकर यांच्यासमवेत डॉ. पुरुषोत्तम देवांग, डॉ.निलेश पवार, डॉ.दिपक दलाल,डॉ.धनंजय मोरे, डॉ.क्षमा चव्हाण, डॉ.विद्या निकुंभ, डॉ.विश्वजित कुलकर्णी, डॉ.हेमंत नारखेडे, डॉ.उत्तम मोरे, डॉ. चेतन पा□ील, डॉ.चांगदेव राऊत, डॉ.शैलेश भारंबे, डॉ.उमेश पा□ील, डॉ. राजेंद्र जाधव, डॉ.अविनाश बागले, डॉ.विलास महिरे, डॉ.प्रियंका शिसोदे, डॉ. रावसाहेब पा□ील, डॉ.विकास शिंदे यांनी या सुर्वण पदकासाठी अर्थसहाय्य केले.

---

जा.क्र.कबचौउमवि/१६/बातमी-हस्तदेय/२०१९      दि.२८ नोव्हेंबर, २०१९

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

----------------------

कृपया, आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिद्ध करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(सुनील पा□ील)

जनसंपर्क अधिकारी